# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३२१/२०११/०१

तक्रार दाखल दिनांक :- ०३/०१/२०११
निकाल दिनांक :- ०३/०३/२०११

श्री पुंडलिक नामदेव चौधरी,
गट नं. १०५, प-लॅट नं, ४३,साईनाथ नगर,
अय्यप्पा मंदिराच्या पाठीमागे,
सातारा परीसर,बीड रोड,
औरंगाबाद. ४३१ ००१

(ग्राहक क्र.४९००११४२८३४४) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०३/०१/२०११ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १७/०१/२०११ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने घरगुती वीज वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११४२८३४४ असा आहे. ग्राहकाचे वीज मीटर दिनांक २९/०६/२००९ रोजी बदली करण्यात आले. ग्राहकाने नवीन मीटर वाचणानुसार वीज बिल देण्याबाबत महावितरण कंपनीच्या कार्यालयात दिनांक २०/०८/२०१०,१६/०१/२०१० तसेच २९/२/२०१० रोजी लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु ग्राहकाचे मीटर वाचण न घेता सरासरी ३८ युनिट वापराचे वीज देयक त्यांना १९ महीन्यापर्यंत देण्यात आले. ग्राहकाने आपले तक्रारीमध्ये मीटर वरील वाचन वाढत असुन मीटर वाचना नुसार वीज देयक न दिल्यामुळे आपण एकत्रीत देयकाचा भरणा करु शकत नाही असे नमुद केले आहे. परंतु वारंवार विनंती केल्यानंतरही मीटर रिडींग नुसार देयक न दिल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल करुन मीटर रिडींग प्रमाणे सुधारीत वीज देयक मीळण्याबाबत व मीटर जलद गतीने फिरत असल्यामुळे त्याची चाचणी करुन देण्यात यावी तसेच झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपये २५०००/- देण्याची विनंती मंचास केली.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक १७/०१/२०११,रोजी ठेवण्यात आली. सुनावणीस वीज ग्राहक व नोडल अधिकारी श्री भारती उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी लेखी जबाब सादर करण्यास पुढील तारीख देण्याबाबत मंचास विनंती केली मंचाने त्यांची विनंती मान्य करुन सुनावणीची पुढील तारीख ३१/०१/२०११ रोजी ठेवली.

३) दिनांक ३१/०१/२०११ रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक हजर नव्हते नोडल अधिकारी यांनी आपला जबाब सादर केला नाही. मंचाने पुढील तारखेस ग्राहकाच्या तक्रारीनुसार मुद्देसुद जबाब तसेच मीटर बदली अहवाल,स्थळ निरिक्षण अहवाल व सुधारीत वीज देयक प्रस्ताव सादर करण्यास अंतिम तारीख ०८/०२/२०११ देण्यात आली.

४) दिनांक ०८/०२/११ रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी आपला जबाब व मंचाने मागणी केलेली कागद पत्रे सादर केली. ग्राहकाने आपले मीटर जलदगतीने फिरत असल्याबाबत तक्रार करुन मीटर चाचणी करण्याबाबत निवेदन सादर केले. मंचाने ग्राहकाचे मीटरची चाचणी त्यांच्या समोर करुन अहवाल ७ दिवसाच्या आत सादर करण्याचे सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल केलेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, वरील ग्राहकाचे मीटरची तपासणी दिनांक २९/०६/२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता भरारी पथक औरंगाबाद यांनी केली असता मीटर मध्ये फेरफार केल्याचे अढळुन आल्यामुळे सदर मीटर बदली करुन त्याठिकाणी नवीन मीटर लावण्यात आले. वरील बाबतीत ग्राहकावर भा.वि.कायदा २००३ चे कलम १३५ नुसार कंपनीने वेगळी कारवाई केली आहे. वरील प्रकरणाचा या तक्रारीचा संबंध नाही. ग्राहकाचे मीटर बदली केल्यानंतर त्यांना नवीन मीटरच्या वाचणानुसार वीज बिल न देता सरासरी ३८ युनिट

वीज आकारणीचे देयक देण्यात आले. ग्राहकाने त्याबाबत वारंवार लेखी तक्रारी कंपनीकडे दाखल केलेल्या आहेत. परंतु कंपनीने त्यांचे तक्रारीची दखल घेतलेली नाही. त्यामुळे ग्राहकास मंचात तक्रार दाखल करावी लागली.

६) नोडल अधिकारी यांनी आपले जबाबामध्ये वर बदली केलेल्या मीटरचा अहवाल भरारी पथकाकडुन प्राप्त न झाल्यामुळे ग्राहकास १९ महीन्यापर्यंत सरासरी ३८ युनिट प्रति महा प्रमाणे वीज देयक देण्यात अल्याचे नमुद केले आहे. वरील अहवाल दिनांक ०९/01/२०११ रोजी प्राप्त झाला असुन त्याप्रमाणे माहे जानेवरी २०११ चे वीज देयक १९ महीन्यामध्ये विभाजन करुन रुपये २७७४०/- ग्राहकास देण्यात आल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाने वरील वीज देयक अवास्तव असल्याचे नमुद करुन वीज कंपनीच्या चुकीमुळे व त्यांनी मीटर रिडींग न घेतल्यामुळे आलेले अवास्तव देयक कंपनीव्या अधिका-याकडुन वसुल करावे. व झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये २५०००/- नुकसान भरपाई द्यावी असे निवेदन सादर केले. मंचाचे आदेशानुसार वरील मीटरची चाचणी ग्राहकाच्या समक्ष केल्यानंतर मीटर योग्य गतीन फिरत असल्याचा चाचणी अहवाल उपकार्यकारी अभियंता छावणी उपविभाग यांनी सादर केला. ग्राहकाने वरील चाचणी अहवालाबाबत असमाधान व्यक्त करुन देण्यात आलेले वीज देयक अवास्तव व अन्यायाकारक असल्याचे सांगीतले.

७) वरील वादग्रस्त मीटरद्वारे ग्राहक दिनांक २९/०६/२००९ ते ११/०२/२०११ पर्यत वीज पुरवठा वापरत होते म्हणजेच मीटर बदली अहवालानुसार १९.५ महीन्यामध्ये ५९७५ युनिटचा वीज वापर झालेला असुन तो सरासरी (५९७५÷१९.५)=३०६ युनिट प्रति महा दिसुन येत आहे. वरील मीटर दिनांक ११/०२/२०११ रोजी बदली करण्यात आले व त्याठिकाणी १४६३५५४६ क्रमांकाचे नवीन मीटर बसविण्यात आले त्या मीटरचे दिनांक १५/०३/२०११ रोजी २८० युनिट वाचण असल्याबाबत स्थळ निरिक्षण अहवाल नोडल अधिकारी यांनी सादर केला आहे.त्यावरुन वरील मीटर नुसार ग्राहकाचा सरासरी वीज वापर २५४ युनिट प्रति महा असल्याचे दिसुन येत आहे. स्थळ निरिक्षण अहवालानुसार ग्राहक १.१४ कि.व्हॅट वीज भार वापरत असल्याचे दिसुन येत आहे.वरील वीज भार लक्ष्यात घेता नवीन मीटरनुसार म्हणजेच २५४ युनिट प्रति महा वीज वापर योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

८) ग्राहकाने आपणास मीटर रिडींग नुसार वीज देयक देण्यात यावे याबाबत कंपनीकडे लेखी तक्रारी दाखल करुनही त्यांना रिंडींग नुसार वीज देयक देण्यात आले नाही महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००५ चे कलम १४.३ नुसार अकृषी ग्राहकांचे मीटर वाचण किमान दोन महीन्यातुन एकदा घेण्याचे सुचीत केले आहे. परंतु प्रस्तुत प्रकणामध्ये कंपनीने १९ महीन्यापर्यंत मीटर वाचण न घेता ग्राहकास देयक वितरीत करुन वरील कलमाचे उंल्लघन केलेले आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे जानेवारी २०११ चे वीज देयक रद्द करण्यात येत असुन ग्राहकास माहे जुलै २००९ ते जानेवारी २०११ या कालावधीमध्ये सरासरी २५४ युनिट प्रमाणे वीज आकारणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज दंडाची आकारणी करु नये.

३) वरील कालावधीमध्ये ग्राहकाने भरणा केलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज देयकातुन करावी.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |